नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०९/२०२५ ( शुक्रवार )**

---

## पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील हातभट्टी दारू विक्रेता सराईत गुन्हेगार प्रज्वल सिध्दार्थ पकीड्डे याला एम.पी.डी.ए. कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

**पोलीस स्टेशन सावनेर** :- पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत राहणारा सराईत **आरोपी नामे प्रज्वल सिध्दार्थ पकीड्डे, वय २७ वर्षे, रा वार्ड क्र ५ ,बाजरचौक, मठ मोहल्ला, पाटणसवंगी, ता. सावनेर, जि. नागपुर** हा हातभट्टीच्या दारू ची अवैधरित्या विक्री करतो.त्याचेवर महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये ६ गुन्हे दाखल असुन तो सदर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले. आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी प्रज्वल सिध्दार्थ पकीड्डे, याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली सावनेर पोलीसांकडुन एम.पी.डी.ए. कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक ११/०९/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार प्रज्वल सिध्दार्थ पकीड्डे, वय २७ वर्षे, रा वार्ड क्र ५, बाजरचौक, मठ मोहल्ला, पाटणसवंगी, ता. सावनेर, जि. नागपुर याला एम.पी.डी.ए. कायदयान्वये कोल्हापुर येथे स्थानबध्द करण्याबाबतचा आदेश काढला असता सावनेर पोलीसांनी तात्काळ दिनांक ११/०९/२०२५ रोजी आरोपीचा शोध घेवुन त्याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले आहे.



**आरोपी नामे प्रज्वल सिध्दार्थ पकीड्डे**

## नागपुर ग्रामीण जिल्हयात  सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ३ गुन्हे नोंद

**दिनांक ११/०९/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई करून खालील प्रमाणे ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

**पोलीस स्टेशन कन्हान :—** पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत आंबेडकर चौक, कन्हान येथे एस.बि. आय. ए.टि.एम च्या मागे खुल्या जागेत आरोपी १. सौरभ पंजाब वासे, वय २६ वर्ष, रा. राम नगर कन्हान, हा आरोपी क्रं २. मयुर हटवार रा. घोरपडे ले आउट कन्हान याच्या सांगण्यावरून लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळवतांना मिळुन आल्याने त्यांचे वर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. रोख रक्कम १२८०/—रूपये आणि  एक अॅड्रॉईड मोबाईल आणि इतर साहीत्य असा एकुण ११,२८५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन बुटीबोरी :—** पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत सपना बार जवळ ,रेल्वे स्टेशन रोड बूटीबोरी येथे १.  विजय जागोजी मांढरे, वय ३७ वर्ष, रा.बुटीबोरी हा आरोपी क्रं २. किशोर मस्के, रा बुटीबोरी,याच्या सांगण्यावरून लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळवतांना मिळुन आल्याने त्यांचे वर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. रोख रक्कम  २,५६५/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत बस स्टॉप जवळील दर्गा जवळ संदीप अरूण पटेल, वय २९ वर्ष, रा. साई मंदीर जवळ, कळमेश्वर हा काही लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळवतांना मिळुन आल्याने त्यांचे वर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. रोख रक्कम १,८०१ /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**तिन्ही कारवाईमध्ये एकुण १५,६५१/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीतांविरूध्द कलम १२(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## संशयीत रित्या गुन्हा करण्याच्या उद्देशाने अस्तिव लपवुन फिरणाऱ्या इसमांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन खापा** —दिनांक ११/०९/२०२५ रोजी खापा पोलीस रात्रगस्त करीत असतांना त्यांना मौजा वाकी येथे आरोपी नामे **पदमाकर घनश्याम इंगोले, वय ३८ वर्ष, रा. वाकी, ता. सावनेर** हा संशयीत रित्या सुर्यास्त ते सुर्योदय दरम्यान गुन्हा करण्याच्या उददेशाने अंधाराचा फायदा घेवुन आपले अस्तित्व लपुन बसला दिसला. त्यानंतर पोलीसांना पाहुन तो पळु लागला पाठलाग करून शिताफिने पोलीसांनी नमुद आरोपीतांना पकडले. पोलीसांनी त्यांना विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तर दिले. सदर आरोपीविरूध्द खापा पोलीस स्टेशन येथे कलम १२२ महाराष्ट्र पोलीस कायद्या अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ११/०९/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १२/०९/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत बोरी टाउन परीसरातील गोदावरी नगर, व्हिडीओ चौक येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एम.आय.डी.सी. चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी केली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री दिपक अग्रवाल यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने